Registered No. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख ३ माहे आक्टोबर १९१० इ० [ अंक ३१

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील

नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ३/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो. नं. ढ ७१

## विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या लोखंडी नांगरांचा खप फारच झपाट्यानें वाढल्यामुळें व विशेषेंकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं आऊतें फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील शेतकीचीं आउतें करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्यभागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत कुडलरोड रेल्वे स्टेशनानजिक किर्लोस्कर वाडीस नेला आहे सबब आपल्यास येवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं आउतें लागतील तीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,
किर्लोस्कर बंधु,
किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,
नो. नं. ढ ६६ जिल्हा सातारा.

### नोटीस

नोटीस चिंध्या वल्लद पायऱ्या, व जंगल्या वल्लद शिवऱ्या, व बापुन्या वल्लद शिवऱ्या, व रावो वल्लद शिवऱ्या, व जान्या वल्लद चिंध्या, महार राहणार जवळवु॥ ता० खामगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मी तुह्मांस माझे मालकीची जागा खालील चतुःसिमेची भाड्यानें राहण्यास दिलेल्याला अजमासें ८।९ वर्षे झालीं, तर नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत माझी जागा माझे ताब्यांत द्यावी. न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. व कोणास गहाण अगर खरेदी करून देऊं नये. दिल्यास बातल असे. कळावें. ता. २८-९-१०

सही
मारुती वल्लद गणु पाटील राहणार
जवळ बुजरुक दस्तुर खुद.

ता० क० रहावयास दिलेल्या जागेची चतुःसिमा पूर्वेस भगवान गवरे यांचें वाडगें, पश्चिमेस जैराम ठिशेलकार यांची जागा, दक्षिणेस रस्ता बाळापूरचा, व उत्तरेस तुकाराम वल्लद अर्जुन पाटील याची जागा.

मा० ग०

नो० नं० ढ ७७

### जाहिर नोटीस.

सर्वत्र लोकांस या जाहिर नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं, १ चिंध्या वा॥ पायऱ्या, व २ जान्या वा॥ चिंध्या, व ३ जंगल्या वा॥ शिवऱ्या, व ४ बापून्या वा॥ शिवऱ्या, व ५ चिंध्या वा॥ शिवऱ्या, ह्या पांच इसमांस मौजे जवळवु॥ ता० खामगांव येथील माझे मालकीची जागा राहण्यास दिली आहे. ती जागा कोणी गहाण अगर खरेदी करून घेऊं नये. घेतल्यास ज्याचा तोच जबाबदार राहील. कळावें ता. २८-९-१० इ.

सही
मारुती वल्लद गणु पाटील दस्तुर खुद.

नो० नं० ढ ७८

## जाहिरात

ऑईल एंजिन, पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे व जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक,
मेसर्स डंकन स्ट्रेटन कंपनींतील ऑईल एंजिन्स एक्स्पर्ट (फील्डींग),
नो. नं. ढ ८० उमरावती.

### NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by messrs. DuncauStratton and Co. of Bombay) can be consulted as to tne purchase conditio nand value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. Ketkar Esq.
Pleader
Amraoti.

नो. नं. ढ ८१

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—पर्जन्याची झोड जोरानें चालू आहे. हस्ताच्या पावसाला हत्तीचा पाऊस ह्मणतात आणि तो तसाच जोरदार, व वेगवान् आहे. काळआज धुकें पडतें या वरून ऋतुंत फरक होऊन पीकें पुनः जोमांत येतील असा अंदाजा आहे. सार्वजनिक आरोग्य पुष्कळ अंशीं समाधानकारक आहे.

प्लेग––उमरावती जिल्ह्यांत बडनेरा, दत्तापूर, इतर ११ खेडीं व उमरावती शहर येथें प्लेगाचे मृत्यु पुष्कळ होतात. आठवड्याची सरासरी २५० मृत्यूवर आहे. बुलढाणा जिल्ह्यांतील मलकापूर, नांदुरा व १७ खेडीं प्लेगानें त्रस्त आहेत. आठवड्याचे मृत्यु शंभरावर होतात. आकोला जिल्ह्यांतील आकोट, पातुर व १४ खेडीं प्लेगाच्या सौम्य साम्राज्याखालीं आलीं आहेत.

रा० रा० एफ. जी. स्लाय, आय. सी. एस., कमिशनर, वऱ्हाड हे रजेवरून येऊन लवकरच वऱ्हाडांत पुन्हां आपल्या कामावर रुजूं होतील.

रा. रा. रुस्तुमजी फर्डूनजी आफि. कमिशनर हे गेल्या बुधवारीं रात्रीं उमरावतीस येथून परत गेले; आणि राजश्री स्लाय साहेब हे रुजूं झाल्या नंतर ते पुनः भंडारा जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर होतील.

मेजर टी. सी. प्रीडन हे रजेवरून परत येतांच आकोल्यास डेपुटी कमिशनरचे जागीं रुजू होतील.

आणि रा० रा० काशीनाथ श्रीराम जठार आफि० डेपुटी कमिशनर हे पुनः खामगांवास सब डिव्हिजन माजिस्ट्रेट होतील.

## वर्तमानसार.

वायव्य सरहद्द प्रांताचे ॲ. ची. कमिशनर यांनीं कोहट खिंडींतील जिरगाहची भेट घेतली पण हत्याराच्या व्यापारांत येणाऱ्या नुकसानीची त्यांस भरपाई करून देण्याचें त्यांनीं साफ नाकारलें. येण्याजाण्याची वाट बंद केल्यामुळें चिडलेल्या कारवान लोकांनीं कांहीं तरी नुकसान करण्याचे हेतूनें तारेचे खांब उपटून पाडले, तारा तोडल्या व टपालाच्या थैल्या पळविल्या अमीरसाहेब एक दरबार भरविणार असून तेथें अफगाणिस्थानांतील प्रांतोप्रांतांचे प्रतिनिधि हजर राहणार आहेत. हत्यारांच्या व्यापाऱ्यांचें डेप्युटेशन अमीर साहेबांकडे गेलें होतें त्यास नुकसानीबद्दल द्रव्याची मदत करून अमीर साहेबांनीं त्यांचें शांतवन केलें असें ह्मणतात. हत्यारांच्या व्यापारास इराणी आखातांत बंदी झाल्यामुळें आफ्रिदी लोकांतही चळवळ सुरू झाली आहे. एका व्यापाऱ्यानें कांहीं हत्यारें सुरक्षितपणें काबूलमध्यें नेलीं. हा व्यापारी एका श्रीमान व्यापाऱ्याचा श्रीमान मुलगा असल्यामुळें त्याच्या बापानें या बद्दल गरीब लोकांत चांगला दानधर्म केला. व लोकांतही त्याच्या या यशस्वीपणाबद्दल वाहवा होत आहे.

Registered No. N. 4

# व्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १० माहे आक्टोबर १९१० इ० [ अंक ३८

ॐनमः श्रीगणेशाय

## आर्य वनौषधालय–मुर्डी.

# अती उंची सुगंधी अत्तरांच्या पेट्या,

### किं० पोस्टखर्चासह २ रुपये ८ आणे.

आमचेकडील माल पूर्ण टिकाऊ व मनोहर सुगंधी असा उत्तम असल्यामुळें तोच नेहमीं वापरणें योग्य आहे. आह्मी पेट्या तयार करून त्या ग्राहकांस देण्याचा क्रम आज पंधरा वर्षे ठेवून सोळाव्या वर्षींही अशा पेट्या तयार करून त्या ग्राहकांस पुरविण्याचा क्रम सुरू ठेविला आहे, ह्मणून दिवाळीचे सणाकरितां अशा उत्तम अत्तरांच्या नेहमीं प्रमाणें पेट्या तयार केल्या आहेत. श्रीमंता पासून गरिबापर्यंत पेट्यांचा लाभ सर्वांस सारखा करून घेतां यावा इकडे विशेष लक्ष देऊन यंदाचे पेट्यांत विशेष सुधारणा केली आहे. पेट्या उत्तम जागाचे लांकडाच्या मजबूत बनवून त्यावर उत्तम पॉलीशही केलेलें आहे, यामुळें पेटी फारच सुबक बनली आहे. अशा पेटींत निरनिराळ्या जातींच्या उत्तम अत्तरांनीं भरलेल्या कुप्या (बाटल्या) सहा, उंची बेलियाची बाटली एक, अतिशय सुगंधी उटणें, लालभडक गंधाचे रवे, व स्त्रियांकरितां लालभडक सुगंधी कुंकवाची डबी एक, असे सुगंधी दहा पदार्थ ठेविले आहेत. यंदांचे पेट्यांत अशी जरी विशेष सुधारणा केली आहे तथांपि पेटीची किंमत न वाढवितां ती फारच अल्प पोस्ट खर्चासह दोन रुपये आठ आणेच ठेविली आहे. या पेट्या एकदम सहा घेणारास एक पेटी व दहा घेणारास दोन पेट्या बाक्षिसा दाखल फुकट देऊं तरी या पेट्यांस जास्त ग्राहक मिळवून एकदम पेट्या मागविणें फायदेशीर होय.निराळा पोस्ट खर्च नाहीं.

### तारुण्यविलासी बादशाही अत्तरें.

सुरंगी ०० ००० तोळ्यास ४ रुपये. मालती ०० ०० ० तोळा. ३ रुपये. पुष्पराज ०० ००० तोळा. ३ रुपये. व या शिवाय गुलाब, केवडा, हिना, खस, अंबर, पाच, जाइ, जुइ, इ. अत्तरें तोळ्यास दीड रुपयापासून पांच रुपये तोळ्या पर्यंत मिळतील. केंसांस लावण्याचीं तेलें, बेलिया, हिना, मसाला, वगैरे दर आठ तोळ्यांस एक रुपया.

या प्रमाणें माल तयार असून या शिवाय लागेल तो सुगंधी माल मागवावा उत्तम पाठवूं, एकदम तीन तोळे अत्तर घेणारास पोष्ट खर्च माफ. तीन तोळ्यांवरें अत्तरें घेणारास दर दोन तोळ्यांस पाव तोळा अत्तर रूपानें कमिशन देऊं पेट्यांस मात्र कमिशन मिळणार नाहीं. सर्व माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठवूं. दिवाळीकरितां लागणारा माल त्वरित मागवावा, ह्मणजे वेळेवर मिळण्यास हरकत पडणार नाहीं. माल चोख व उत्तम असाच पाठवूं.

पत्ता— कृष्णशास्त्री पेंडसे वद्य
मु॥ मुर्डी पो० हर्णै.
जि० रत्नागीरी.

नो० न० द ८९.

## जाहिरात

ऑईल एंजीन पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेंचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक,
मेसर्स डंकन स्ट्रेटन कंपनींतील ऑईल एंजिन्स एक्स्पर्ट (फील्डींग),
नो. नं. द ८० उमरावती.

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by messrs. DuncanStratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:– C/o N. G. Ketkar Esq.
Pleader
Amraoti.

No. N. Dh. 81

## जाहिर लिलाव.

विद्यमान ॲडिशनल सबजज्ज साहेब कोर्ट आकोला.

यांचे फैलावरील दिवाणी मुकदमा नंबर ६१ सन १९१० यांतील वादी धनजी जाधवजी रहाणार आकोला व प्रतिवादी सांगीदास नंदलाल वगैरे इसम ७ रहाणार आकोला यांत वादी प्रतिवादीचे दरम्यान सांगीदास रामचंदर जीन कंपनी या नांवानें चालत असलेली आकोला येथील रेचे ३२-चे जीन फ्याक्टरीचे कोर्टानीं मला रिसीव्हर नेमीलें आहे व पक्षकारांची भागीदारी या पूर्वी मोडल्यामुळें सदरहू जीन फ्याक्टरी एकंदर स्टोर व सामानासह तारीख ९ माहे नोवेंबर सन १९१० ईसवी रोजीं प्रातःकाळीं ८ आठ वाजतां आकोले येथील जीन फ्याक्टरीचे कंपौडांत लिलाव केली जाणार आहे. सदरहूचे तपसीलवार जाहिरनामे कोर्टाचे इमल्यास व आकोले येथील चावडीस लाविले आहेत. या शिवाय जास्त माहिती व स्टोर सामान वगैरे पहाणें असल्यास त्यांनीं रिसीव्हर यांस भेटावें ह्मणजे सर्व सविस्तर माहिती मिळेल. सदरहू जीन फ्याक्टरी या येत्या सिझन मध्यें चालविण्या सारखी आहे. कळावें तारीख १ माहे आक्टोबर सन १९१० ई०

सही
देवीराम कोंडजी नागर आकोला.

नो. नं. द ८६

## जाहिर नोटीस.

जाहीर नोटीस देण्यांत येतें कीं धी बेरार म्याच मेकींग फ्याक्टरी इलिचपूर हिची जमीन, इमारती, यंत्रें वगैरे व आगपेट्या तयार करण्याचें कच्चें सामान इलिचपूर येथें जाहीर लिलावानीं कारखान्याचे कंपौंडांत ता० २३ आक्टोबर सन १९१० रविवार रोजीं सकाळीं ८॥ वाजतां विकलें जाईल. ज्यांची लिलावांत बोलण्याची व विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं वरील तारखेस सदर्हू जागीं सदर्हू वेळीं हजर रहावें.

या संबंधीं ज्यास्त माहिती कंपनीचे आफिसांत रोज सकाळीं १० वाजल्य पासून ५ वाजे पर्यंत मिळेल.

इलिचपूर क्यांप ) आबाजी नारायण
ता. ३०।९।१० } चिखलीकर.

लिक्वीडेटर आफ धी म्याच फ्याक्टरी,
नो. नं. द ८४. इलिचपूर.

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्यां बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ { एजंट
नं ७३

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव व्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१-९-१० { एजंट.
नो. नं. द ७१

## विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या लोखंडी नांगरांचा खप फारच झपाट्यानें वाढल्या-कारणानें व विशेषेकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं आऊतें फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील शेतकीचीं आउतें करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्य-भागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत कुंडलरोड रेल्वे स्टेशनानजिक किर्लोस्कर वाडीस नेला आहे. सबब आपल्यास येवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं आउतें लागतील तीं खालीं लिहिलेल्या पत्त्यावर मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,
किर्लोस्कर बंधु,
किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,
नो. नं. द ६६ जिल्हा सातारा.

## वर्तमानसार.

येथें राहून लोंकाचें कर्ज काढून निर्वाह करित आहे. आज सरासरी पांच महिने झाले आहेत. तुमचा माऊ आला तेव्हां तुह्मी कां आले नाहींत याचें कारण ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत कळवावें. व तुह्मी माणसांत नाहीं हेंही मी पूर्णपणें जाणून आहे यापूर्वी मी आपले येथें वर्ष दीड वर्ष होते. परंतु आपला मला मुळींच स्पर्श सुद्धां नाहीं व तुह्मी दिलेली नोटीस सर्व प्रकारें खोटी आहे. तुह्मी खावटीचे खर्चा करितां हीं नोटीस दिली हें मी पूर्ण जाणून आहे, तरी खावटीचा खर्च जोंपर्यंत तुह्मी फारकती देणार नाहीं तों पर्यंत तुमचेवर राहील असें पूर्ण समजावें. हीं नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत फारकत देण्याचें करावें करितां सूचना दिली त्याप्रमाणें उत्तर देऊन निकाल करावा. ह्मणजे दुसरा घरठाव करीन. आपलें उत्तर न आल्यास दिलेली सुचना हीच फारकत समजली जाईल. कळावें ता. २७।९।१० इ.

सही

जैवंती मर्द झाबू मुंढीन आमतपूरकर
हल्लीं मुकाम देवरी पो० आकोट नि०
खु० हातची बांगडी.

नों० नं० ण ६

---

## नोटीस

नोटीस बेहमी सीताराम वल्लद नारायण वेहर राहणार धनवाडी तलुके दर्यापूर यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं मौजे धनवाडी येथील सर्वे नंबर १६ ए. गुंठे २२-१९ आकार रुपये ४४ यांत माझा निमे हिसा आहे सदर्हू शेतांत माझा आठ आणेचा हिस्सा आहे व त्यात आंब्याचीं झाडें आहे सदर्हू हिशाचा व आंब्याचे झाडांचे निमे बाराचा मी आजपर्यंत एकत्रांत उपभोग घेत आलों. सदर्हू शेताची वाही वगैरे किस्तकारी करण्यास तुह्मास सांगीतलें असतां तुह्मी ह्मणाले कीं मी आपले हिशांत रब्बी पेरतो वरून मीं आपलें हिशाची वाही पेर करून त्यांत जवारी पेरली ती हल्लीं उभारणीस आली. सदर्हू जवारी डवरण्यास मी गेलों असतां तुह्मी मला हरकत केली त्यामुळें माझें नुकसान होत आहे तर या नोटीसीनें तुह्मास कळविलें जातें कीं तुह्मी मला माझे हिशाचे निमे शेतांत जवारींत डवरे वाहण्यास हरकत करूं नये. हरकात केल्यास माझे पीकाचें नुकसान दर तिफणीस रुपये १५० प्रमाणें रुपये ४०० भरोन घेईन मग तकरार ऐकणार नाहीं तारीख १८।१०।१०

सही

निशाणी सखाराम वल्लद माहादोजी कुणबी धनवाडा याची

नो. नं, ण ७ रेघ - -

---

## नोटीस.

बेहमी— शेख इमाम वा। शेखकालु मोमीन भोंड राहणार पेठ बाळापूर यांस —

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे पेठ बाळापूर येथील घर दोन मजली दरमहा ।॥' प्रमाणें भाड्यानें घेतलें आहे. त्याची चतुःसीमा पूर्वेस सरकारी हमरस्ता, दक्षिणेस गल्लीचा रस्ता व शेखमलंगाचें घर, उ० गुलमहमद मोमीन याचें घर, पश्चिमेस गुलमहमद याचें घर. वरील घर आपल्या जवळ भाड्यानें आहे तें आह्मास आतां खालीं करून पाहिजे आहे तें घर खालीं करण्यासाठीं मी तोंडी १६।१०।१० रोजीं तुह्मास भेटलें असतां तुह्मी इनकार केला सबब या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं आपण ही नोटीस पावले पासून १५ दिवसांचे आंत घर खालीं करून द्यावें. असें जर मुदतींत न केल्यास रीतीप्रमाणें व्यवस्था केली जाईल. मग त्यास लागणारा सर्व खर्च या नोटिशीच्या खर्चासुद्धां घेतला जाईल. घर भाड्यानें घेतले पासूनचें भाडेंही आपणापासून घेणें आहे तेंही मुदतींत आणून द्यावें नाहींतर त्याचीही फिर्याद केली जाईल कळावें, ता. २६।१०।१०

सही

गुलाम यासीन वा। गुलाम रसूल रा० बाळापूर द० खु०

नो नं ण ८

---

## नोटीस.

रा. रा. महादु वल्लद दत्तु सोनार रा० जालनापूर इलाखा मोगलाई यांसः——

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून लग्न झाल्यावर मजला नीट न वागवितां एक दिवस इतका भयंकर तुह्मी मार दिला कीं त्यापासून मी उभी रक्तानें न्हाले आणि मजला तुह्मी घराबाहेर काढून देऊन तुह्मी दुसरें लग्नही करून संसारसुख भोगू लागला. हल्लीं माझ्या बापाचें व भावाचें ह्मणणें आहे कीं, तूं चपां वर्षे घरीं बसून खाल्ल्यामुळें आह्मास खर्च लागला. आतां तूं आपली कोंठे तरी सोय करून आमच्या पैशाची फेड कर. आतां मी गंधर्वाचा नवरा पाहून पांच वर्षांचा खर्च बापानें केलेल्या पैशाची अदाई करणार. त्या पूर्वीं तुह्मास या नोटीसीनें कळविते कीं पांच वर्षांच्या अन्नवस्त्राबद्दल दरसाल रुपये १०० प्रमाणें ५०० रुपये व एक वर्षाबद्दल अगाऊ १०० रुपये असे ६०० रुपये नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मजला द्यावे. आणि पुढेंहि दरसाल १०० रुपयां प्रमाणें अगाऊ अन्नवस्त्रा बद्दल देत जावे. या प्रमाणें आठ दिवसांचे आंत तुमच्या कडून पैसे न आल्यास मी दुसरा नवरा करण्यास तुमची संमती आहे असें समजून नवरा करीन. मग तुमचा कोणत्याच रीतीचा हक्क मजवर राहणार नाहीं. कळावें ता. २६ माहे आक्टोबर सन १९१० इ०

सही

सावित्री मर्द महादु सोनार इचे निशाणी हातची बांगडी.

दस्तुर भीमराव रा० बुलडाणा वऱ्हाड.

नो. नं. ण ९

---

# जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक,

मेसर्स डंकन स्टेटन कंपनींतील ऑईल एंजिन एक्सपर्ट (फील्डींग),

नो. नं. ढ ८० उमरावती.

---

बद्दल फा

नोटीस बेशमी रेणुका मर्द हरबाजी पाटील राहणार जळगांव (नार्टे) परगणे अडगांव तालुका आकोट

यांस:—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचा मयत भ्रतार हरबाजी वल्लद दर्याजी पाटील याजपाशीं ९।२।१८९६ च्या तारखेचें तावेगहाण ९०० रुपयांचें होतें. तावेगहाणांतील शेत मी खरिदी घेतलीं ह्मणून मी तुमच्या गहाणाचा निकाल करण्यासाठीं तुमच्या नवऱ्याकडे गेलों तर त्यांनीं मला १००० रुपये तावेगहाणावरून निघतात असें सांगि-तलें. मी तुमच्या नवऱ्याच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन तुह्माला १००० एक हजार रुपये १८।१।१९०८ रोजीं दिले आणि तावेगहाण खत देखील परत घेतलें. पण आतां असें समजतें कीं तुमच्या नवऱ्यानें मला फसवून १००० रुपय घेतले आहेत आणि हिशेब कसाही केला तरी ९०० रुपयां पेक्षां अधीक रक्कम कधींच निघत नाहीं. तर ही नोटीस पोचल्या तारखे पासून १५ दिवसांचे आंत माझे रुपये जे तुह्माकडे फिरतात ते व्याजासुद्धां मला आणून पोंचते करावे. असें न केल्यास तुह्मावर दिवाणींत दावा करून सर्व रक्कम इतर खर्चासुद्धां वसूल केली जाईल. कळावें. ता. २५ आक्टोबर १९१० इ.

सही

मस्तेखा मुरादखा जमादार राहणार पाथर्डी तालुका आकोट

नो. नं. ण ३ निशाणी बखर

---

## नोटीस

१ संभु वा॥ मुर्डाजी राहणार लाडनापूर
२ रंभु वा॥ मुर्डाजी राहणार लाडनापूर

उभयतांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं तुमच्या पैकीं संभु वा॥ मुर्डाजी ह्याला मीं रा० रा० लक्ष्मणराव जहागीरदार टुनकीकर यांनीं मजवर एक फिर्याद केली होती त्याचे संबंधीं काम चालविण्या बद्दल मुखत्यार नेमलें होतें त्यांनीं मजजवळ दाव्याच्या खर्चासाठीं २०० रुपये मागितले त्यावेळीं ते मजजवळ नसल्यानें तुमच्या जवळच मौजे आलेवाडी येथील शत सर्वे नंबर १० ३ एकर २ गुंठे आकार रुपये २१ हें शेत २०० रुपयांस गहाण ठेवलें. २०० दोनशें रुपये वसूल घेतला पण तो संभुस पुन्हां फिर्यादीच्या कोर्ट खर्चास ह्मणून परत दिला. पण मला आतां अशी बातमी लागली आहे कीं, तें शेत तुह्मी मला गहाण घेतों असें सांगून तुह्मी त्याची ६०० रुपयांची खरेदी करून घेतली आहे. हा तुह्मी मजशीं दगलबाजी केली. संभु हा माझ्या पाटीलकीच्याही कामावर दोन तीन वर्षांपासून मुखत्यार असल्यामुळें मला हा कांहीं दगल-बाजी करील असा संशयही आला नाहीं. सबब या नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी मजजवळून फसवून घेतलेलें खरेदीखत रद्द असें. मी तुमच्या जवळ ते शेत गहाण ठेविलें आहे तुह्मास जे २०० रुपये दाव्याच्या खर्चास दिले त्याचा हिशेब द्यावा व आतां मला गहाण ठेवणें नाहीं सबब सर्व फिर्यादीस लागलेला खर्च व्याजा-सुद्धां देण्यास तयार आहे तर ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांच्या आंत तुह्मी व जे मी तुह्मास दाव्या संबंधी मुखत्यार-पत्र दिलें तेंही रद्द आहे. वरील मुदतींत जर तुह्मी निकाल केला नाहीं तर मला योग्य ती व्यवस्था करणें भाग पडेल व त्यास लागणारा खर्च या नोटीसीच्या ख-र्चासह सर्व तुह्मावर पडेल. तुह्मी पोकळ खरेदीखताच्या आधारें शेतावर ताबा करूं नये आजपर्यंत माझाच ताबा आहे कळावें. ता० २६।१०।१०.

सही

चंपाबाई जवजे नारायणराव देशमुख निशाणी बांगडी.

तर्फे वीरसींग रुपचंद देशमुख राहणार लाडनापूर पो० सोनाळे ता० जळगांव निशाणी आंगठा.

नो० नं० ण ४

---

## नोटीस

रा. नारायणआप्पा वल्लद खंडाप्पा वाणी राहणार पेठ बाळापूर यांस:—

मी खालीं सही करणार नोटीस देतें कीं तमचा मयत चुलतभाऊ नामें विठोबा-आप्पा यांची मी खास लग्नाची बायको असून मजला तुह्मी घरांतून काढून दिलें व मला पोटगीही दिली नाहीं. माझ्या नवऱ्याची व तुमची इस्टेट पूर्वीपासून एकत्र असून आज सर्व व्यापारधंदा व इस्टेट तुमच्याच ताब्यांत आहे. या एकंदर इस्टे-टीच्या उत्पन्नाचे मानानें मजला आजपर्यंत कमित कमी दरमहा रुपये ३० तीस प्रमाणें तुह्मी पोटगी दिलीच पाहीजे होती परंतु ती न मिळाल्यामुळें व तुह्मी मला घरांतून काढून दिल्यामुळें मला माझे आ-ईबापाचे घरीं राहावें लागलें त्यामुळें माझे स्वतःच पोटगी करितां दुसऱ्याचे एक हजार १००० रुपये कर्ज झालें आहे. तरी या नोटीसीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं आजवर माझे पोटगी करितां कर्ज झालेले रुपये १००० एक हजार देऊन पुढें दरमहा ३० तीस रुपये प्रमाणें माझे पोटगी करितां तुह्मी दिले पाहिजे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील रक्कम १००० एक हजार व चालू महिन्याचे रुपये ३० माझे घरीं बाळापूर येथें माझे जवळ आणून द्यावे. असें न दिल्यास कायद्या प्रमाणें सदरहू रक्कम या नोटीसीच खर्चासह घेण्याची तजवीज करीन.

सही

सुभद्री मर्द विठोबा आप्पा वाणी राह-णार पेठ बाळापूर दस्तुर खुद्द.

नो. नं. ण ५

---

## नोटीस.

रा. झाबू वा॥ शिवराम मुंढे रा० आमतपूर जि० आकोला. यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी ता० १२ सप्टेंबर १९१० इसवीला वऱ्हाडसमाचार पत्रांतून जी नोटीस दिली तिचें उत्तर खालील प्रमाणें:— मी दिवाळी करितां गेलीं नसून लग्नाक-रितां निमेऱ्यास गेलीं होती. आपण लिहिलें कीं दागदागीन्यांसह गेली परंतु दागीने माझे अंगावर कांहीं एक नसून पूर्वी तुह्मीच दागीने काळाचे वेळीं सर्व मोडलेत. तेव्हांपासून माझे अंगावर कांहीं नाहीं. माणसांत नसल्या बद्दलचा बहाणा नसून ती गोष्ट खरीच आहे. सबब मी तुमचे येथें वागण्यास राजी नाहीं, माझे आईबापाचे